RNI No. MAHMUL/2013/54090

ISSN-2349-3984
Impact Factor - 5.686

आज़ादी का अमृत महोत्सव

# MANAVLOK RESEARCH BULLETIN

(A Quarterly Peer Reviewed Journal)
Special Issue - I



Lokraja Chhatrapati Rajarshi Shahu Maharaj
Commemorative Centenary Year
and the
Birth Anniversary of
Dr. Dwarkadasji Lohiya (Babuji)



## Contribution of Chhatrapati Rajarshi Shahu Maharaj in Social Development

Editors

**Dr. Prakash Jadhav**
Principal,
Manavlok's College of Social Work, Ambajogai

**Dr. Hanumant Salunke**
Assistant Professor

**Sukeshini Jogdand**
Assistant Professor

**MANAVLOK'S COLLEGE OF SOCIAL WORK**
Post Box No. 23
Ring Road, Ambajogai, Dist.Beed, (MS) Pin-431 517
E-mail:- manavlok1999@gmail.com
Websit :- www.manavlokcollegeofsocialwork.co.in

Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| 39 | राजर्षी शाहू महाराज यांचे समाज विकासातील योगदान<br>बनसोडे अर्चना लक्ष्मणराव | 193 |
| 40 | राजर्षी शाहू महाराज यांचे शैक्षणिक विकासातील योगदान<br>शरद ज्ञानोबा काकडे | 196 |
| 41 | राजर्षी शाहू महाराजआणि माणगांव परिषद<br>*डॉ.अरविंद लोणकर* | 199 |
| 42 | राजर्षी शाहू महाराज यांचे शैक्षणिक विकासातील योगदान<br>प्रा. दत्तात्रय प्रभुराव मुंढे, | 203 |
| 43 | छत्रपती शाहू महाराजांचे सामाजिक योगदान<br>दिगंबर भाऊरावजी दुले | 208 |
| 44 | "राजर्षी शाहु महाराजांचे सामाजिक सुधारणेतील योगदान"<br>प्रा.डॉ. दिलीप काशीनाथ काठोडे | 213 |
| 45 | अस्पृश्यता उद्धारक: छत्रपती शाहू महाराज<br>*प्रा. डॉ. कल्याण गोलेकर* | 217 |
| 46 | छत्रपती शाहू महाराजांचे स्त्री विषयक कार्य आणि सद्यस्थिती.<br>किरण प्रभाकरराव मोहोड | 223 |
| 47 | राजर्षी शाहू महाराज यांचे सामाजिक क्षेत्रातील कार्य<br>प्रा.डॉ.मधु प्रभाकर खोब्रागडे | 229 |
| 48 | राजश्री शाहू महाराज : शैक्षणिक कार्य<br>डॉ. राजू के. माटे | 237 |
| 49 | राजर्षी शाहू महाराज यांचे महिला सक्षमीकरणातील योगदान<br>प्रा. श्रीमंत श्रीरंगराव निकाळजे | 241 |
| 50 | राजर्षी शाहू महाराज यांचे वंचित घटकांच्या पुनरुत्थानातील योगदान<br>*विजय देविदासराव रजाने* | 245 |
| 51 | राजश्री शाहू महाराज यांचे सामाजिक न्याय स्थापनेतील योगदान<br>डॉ. प्रफुल ईश्वर ढोके | 250 |


Scanned with OKEN Scanner

# अस्पृश्यता उद्धारक: छत्रपती शाहू महाराज

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

प्रा. डॉ. कल्याण गोलेकर
सहाय्यक प्राध्यापक
कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय,
सोनपेठ, जि. परभणी
मो. 9766182395

ज्यांचा उल्लेख डॉ. बी. आर. आंबेडकर यांनी pillar of social democracy असा केला आहे अशा छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या कार्याची आघाडी दोन आघाड्यावर उघडली होती. एक म्हणजे राजकीय तर दुसरी म्हणजे सामाजिक सुधारणा होय. दोन्हींचे व्यासपीठ त्यांनी एकच बनविले होते एकाच व्यासपीठावरून दोन्ही कार्यांचा शुभारंभ एकदाच सुरू करून दोन्ही कार्य सुरू केल्यामुळे दोन्हीपैकी एका कार्याला खिळ बसते असा समज त्यांनी खोटा ठरविला होता. त्यांच्या सामाजिक आणि राजकीय कार्याला अनेक कांगोरे होते. त्यांच्या सामाजिक कार्यांपैकी एक महत्त्वपूर्ण सामाजिक कार्य म्हणजे अस्पृश्यता निवारणाचे कार्य होय. पेशवाई काळातील उरली सूरलेली जातीव्यवस्थेची सर्व जटमळे त्यांनी पूर्णपणे नष्ट करण्याचा प्रयत्न त्यांच्या कालखंडात केलेला दिसून येतो. त्यांच्या अस्पृश्यता निवारण कार्याला खऱ्या अर्थाने वेदोक्त प्रकरणापासूनच सुरुवात झालेली आढळते. कारण या प्रकरणात उच नीचतेचा संबंध येतो. केवळ विशिष्ट जातीविरुद्ध केलेला भेदभाव किंवा त्यांना उच निचतेची दिलेली वागणूक म्हणजे अस्पृश्यता म्हणता येत नाही. अस्पृश्यतेची व्याप्ती त्यांच्या कार्यावरून खूप मोठी असल्याचे लक्षात येते. छत्रपती शाहू महाराज मराठा जातीतून येत असले तरी त्यांना पुरोहित वर्ग शूद्रच समजत होता. त्यांच्या जीवनात अशा अनेक घटना घडत गेल्या की त्यामुळे त्यांच्या अस्पृश्यता निवारण कार्याला चालना मिळत गेली.

छत्रपती शाहू महाराज सातारला गेले असताना त्यांच्यासाठी जेवण बनवण्याचे काम चालू होते जेवणाची वेळ झाली म्हणून महाराज स्नान करून जेवणाचे कुठपर्यंत आले आहे हे पाहण्यासाठी फिरू लागले, तेव्हा त्यांना हातात मांजर घेऊन उघडबंब असलेल्या सोवळेकर्याने पाहिले आणि म्हणाला, " इकडून हिंडता येणार नाही आपल्याला शिवा शिव झाली म्हणजे साराच घोटाळा उडून जाईल"असे उद्गार काढताच त्यांचे काळीज कापल्यासारखे झाले. त्या मांजरापेक्षाही मी खालच्या दर्जाचा? असा प्रश्न स्वतःलाच विचारून मी स्वतः छत्रपती असताना असा माझा अपमान तिथं अस्पृश्यांचा किती होत असेल? असे उद्गार काढून ते अंतर्मुख झाले . या घटनेने त्यांच्या अस्पृशुता निवारण कार्याला गती प्राप्त झाली. त्याचाच एक भाग म्हणून दोन एप्रिल 1894 मध्ये छत्रपती शाहू यांनी राज्यभिषेक सोहळ्यानंतर प्रशासनात, राज्यकारभारात अमुलाग्र बदल केले. त्यावेळी कोल्हापूर प्रशासनात, राज्यकारभारात 71 अधिकाऱ्यांपैकी 60 ब्राह्मण होते तर त्यांच्या खासगी नोकरीत 52 पैकी 45 ब्राह्मण होते. संस्थानातील लोकसंख्येत ब्राह्मणांचे प्रमाण पाहता नऊ लाख लोकसंख्या वस्तीत सव्वीस हजार ब्राह्मण होते. त्यांचे शिक्षणाचे प्रमाण 80 टक्के होते. उरलेल्या 20 टक्क्यात बहुजनांचे अत्यल्प प्रमाण होते. त्यामुळे जुने प्रशासन मंडळ बरखास्त करून त्यांनी "हुजूर-कार्यालय" सुरू केले. यामध्ये बहुसंख्येने बहुजनांच्या नेमणुका केल्या या नेमणुकांना इंग्रज आणि ब्राह्मण अधिकाऱ्यांनी विरोध केला पण तो महाराजांनी मोडून पाडला त्या नेमणुका तशाच ठेवल्या, या नेमणुकांच्या मागचा मूळ हेतू आपण पाहिला तर तो अस्पृश्यता निवारण हाच असलेला आढळतो. जातीव्यवस्थेला धक्का देणारे सर्वात महत्त्वाचे प्रकरण म्हणजे वेदोक्ताचा सामाजिक संघर्ष होय. वेदोक्त प्रकरण हे हिंदू धर्मातील वर्णव्यवस्थेवर आधारित होते. हिंदू धर्मात एकूण चार वर्ण आहेत. यापैकी ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य या पहिल्या तीन वर्णांना वेदोक्ताचा धार्मिक अधिकार दिलेला आहे. कारण ते आर्य वंशाचे आहेत तर शूद्र हा चौथा वर्ण अनार्य वंशाचा असल्यामुळे त्यांना पुराणोक्ताप्रमाणे धार्मिक विधी करता येतील. त्यांना वेदोक्ताप्रमाणे कोणतेही धार्मिक विधी, कार्यक्रम करता येणार नाहीत असा कडक नियम त्याकाळी होता. यासाठी पहिल्यांदा आपण वेदोक्त व पुराणोक्त म्हणजे काय?

Warpudkar (ACS) College, Sonpeth, Dist. Parbhani

हे समजून घेतले पाहिजे. वेदोक्त म्हणजे?-वेदांमध्ये जे मंत्र सांगितले आहेत त्यावर आधारित असणाऱ्या धार्मिक विधींना वेदोक्त म्हटले जाते. वेद हिंदू धर्मातील सर्वश्रेष्ठ ग्रंथ असून ते अपौरुषेय म्हणजेच मानवनिर्मित नाहीत.

पुराणोक्त म्हणजे?-जे विधी मानवांनी रचलेल्या पुराणातील मंत्रावर आधारित केले जातात त्यांना पुराणोक्त असे म्हटले जाते. 1899 च्या कार्तिक महिन्यात शाहू महाराज आपल्या परिवारासह कार्तिक स्नानासाठी पंचगंगेच्या पाण्यात उतरले त्यांचे स्नान चालू असताना नारायण भटजी मंत्र म्हणत होते. त्यांच्या सर्व परिवाराबरोबरच मुंबईचे प्रसिद्ध बंडखोर समाज सुधारक राजारामशास्त्री भागवतही होते. ते धर्मशास्त्राचे गाढे पंडित तसेच बहुभाषिकही होते. स्नानाच्या वेळी त्यांच्या असे लक्षात आले की नारायण भटजी स्नान न करताच अंगावर रात्रीचे कपडे तसेच ठेवून तो वेदोक्त मंत्र न म्हणता पुराणोक्त मंत्र म्हणत आहे. हे त्यांनी शाहू महाराजांच्या लक्षात आणून दिले. त्यावेळी शाहू महाराजांनी नारायण भटजीला दोन प्रश्न विचारले "भटजी आंघोळ बिंघोळ केली नाही वाटतं? त्यावर भटजी नाही म्हणाले. शाहू महाराजांनी दुसरा प्रश्न केला की, आंघोळ न करताच मंत्र म्हणताय, आता तुम्ही कोणते मंत्र म्हणत होता. वेदोक्त की पुराणोक्त? त्यावर भटजीचे उत्तर आले की अर्थात पुराणोक्त! का म्हणून चढ्या आवाजात महाराजांनी प्रश्न विचारताच भटजी उद्गारले, वेदोक्त मंत्र हे क्षत्रियांसाठी असतात शूद्रांना पुराणोक्त मंत्र म्हणावयाचे असतात. नारायण भट पुढे असेही म्हणतो की,'जोपर्यंत सर्व शक्तिमान ब्राह्मण वर्ग तुम्हाला क्षत्रिय म्हणून मान्यता देत नाही, तोपर्यंत तुम्ही 'क्षत्रिय कुलावंतस' अशी बिरुदावली मिरवली तरी मी तुम्हाला शूद्रच मानणार. या उत्तराने महाराजांच्या अंगावर वीज कोसळावी तशी ही अभद्रवाणी कोसळली होती. परंतु ते गप्प बसतील तर महाराज कसले त्यांनी या जातीय प्रथेला मोडून काढण्यासाठी सर्व सामर्थ्यानिशी बंड करण्याचे ठरवले या घटनेने त्यांच्या कार्याला आणि जीवनाला वेगळीच कलाटणी मिळाली होती. ही जातिव्यवस्था घट्ट करण्यासाठी ब्राह्मण मंडळींनी काही सिद्धांत पुढे केले होते उदा: जगात ब्राह्मण व शूद्र हे दोनच वर्ण राहिले आहेत. कलियुगात क्षत्रिय वर्ण नाहीसा झाला आहे. परशुरामाने 21 वेळा पृथ्वी नि:क्षत्रिय केली आहे. तसेच ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलाप्रमाणे ईश्वराच्या मुखातून ब्राह्मण, बाहूतून क्षत्रिय, पोटातून वैश्य आणि पायातून शूद्र निर्माण झाल्याचा सिद्धांत ते सांगत असत. या प्रसंगाने महाराज अंतर्मुख झाले आणि त्यांच्या अस्पृश्यता निवारण कार्याला वेग प्राप्त झाला. संस्थानातील अशा अस्पृश्यतेला शिक्षणाचे प्रमाण काही अंशी जबाबदार होते. 1881 च्या आकडेवारीनुसार 79.1/ ब्राह्मण, मराठा 8.6/,कुणबी 1.5/, मुस्लिम 7.5/तर जैन लिंगायताचे 10.6/साक्षरतेचे प्रमाण होते अशा अज्ञानी समाजाचा फायदा ब्राह्मण वर्गाकडून उचलला जात होता. त्यामुळे जाती व्यवस्था घट्ट बनली होती. ती त्यांना नष्ट करावयाची होती यासाठी त्यांनी 1897 मध्ये राजाराम कॉलेजला जोडून त्यांनी सर्व जाती-धर्माच्या विद्यार्थ्यांना एक वसतिगृह सुरू केले. परंतु या वसतिगृहात उच्चवर्णीय मुलांनी खालच्या जातीच्या विद्यार्थ्यांना भेदभावाची, जातीयतेची वागणूक देऊन त्यांचा छळ केला. परिणामी ब्राह्मणेतर एक एक विद्यार्थी वस्तीगृह सोडून गेले. जेव्हा बहुजन समाजातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी होणाऱ्या हाल अपेष्टा पी.सी. पाटील या प्रथमच मॅट्रिक पास झालेल्या मराठा विद्यार्थ्यांच्या तोंडून महाराजांनी ऐकल्या तेव्हा ही घटना त्यांच्या वस्तीगृह निर्मितीच्या चळवळीस कारणीभूत ठरली. जातवार वस्तीगृहांची निर्मिती हा जाती व्यवस्थेवरील एक प्रमुख उपाय होता तसेच कोणत्याही मार्गाने का होईना बहुजनांची मुले शिकली पाहिजे हा एक त्या मागचा प्रमुख उद्देश होता. यामधूनच पहिले जातवार वेगळे वस्तीगृह निर्माण झाले. 18 एप्रिल 1901 मध्ये त्यांनी व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग इन्स्टिट्यूशन म्हणून सुरू केले. त्यानंतर त्यांनी प्रत्येक जातीच्या पुढाऱ्याला बोलावून त्यांना वसतिगृहे सुरू करण्यासाठी प्रोत्साहित केले. यासाठी त्यांनी त्यांना जागा, पैसा इत्यादी सर्व बाबी उपलब्ध करून दिल्या. त्यामुळे 1901 ते 1922 पर्यंत कोल्हापुरात 22 वस्तीगृह निर्माण झाली. अस्पृश्य समाजाच्या मुलांसाठी त्यांनी मिस क्लर्क होस्टेल सुरू केले परंतु या वसतिगृहातील अस्पृश्य मुलांमध्येही एकमेकांच्या जातीबद्दल उचनीचतेची भावना होतीच त्यामुळे ही सर्व अस्पृश्य जातीची मुले एकत्र राहू शकत नाहीत हे त्यांच्या लक्षात येताच त्यांनी चांभार, ढोर या दोन जातींच्या मुलांसाठी 1919 मध्ये दोन वस्तीगृह स्थापन केले. (इंदुमती राणीसाहेब वसतिगृह) वस्तीगृहाच्या चळवळीतून त्यांनी प्रत्येक जातीला आपल्या जातीविषयी जी अस्मिता असते तिचे रूपांतर त्यांनी शिक्षण प्रसारसारख्या विधायक कार्यात करण्याचे यशस्वी प्रयत्न केले. जातवार वस्तीगृहाच्या निर्मितीमुळे जातीयता नष्ट होण्याऐवजी ती अधिकच वाढली असेल असे आपणास वाटते. पण शाहू महाराजांचा दृष्टिकोन यापेक्षा वेगळा होता, सर्व जातीच्या मुलांना एकाच वस्तीगृहात ठेवले तर जातीच्या उच-नीचेतेच्या कल्पनेतून त्यांच्यात संघर्ष होईल आणि सर्वजण शिक्षणापासून वंचित राहतील. जर कोणीच शिकले नाही तर त्यांना जाती व्यवस्थेतील फोलपणा समजणार



Scanned with OKEN Scanner

नाही म्हणून त्यांना जातवार का होईना पण सुशिक्षित करून त्यांना परस्परातील जातीयता कमी करावयाची होती. जातीव्यवस्थेतील फोलपणा सिद्ध करावयाचा होता. जातवार वस्तीगृह निर्माण करण्याचा त्यांचा आणखी एक मुख्य हेतू असा होता की ज्यांना जातीचा फार अभिमान आहे अशा आई बापांनी "जात बुडते" म्हणून त्यांची मुले वस्तीगृहात पाठवली नसती उलट जातीचे वस्तिगृह आहे म्हटल्यावर आपली मुले शिकली तर "जात तरते " या आशेवर आई-वडील मुलांना शिक्षणासाठी पाठवायचे धाडस करत होते. कुटुंबापेक्षा जात मोठी व जातीपेक्षा समाज मोठा ही जाणीव निर्माण होण्यासाठी प्रथम शिक्षणाच्या प्रसाराची गरज शाहूंना वाटत होती. त्यासाठी प्रत्येक जात आर्थिक दृष्ट्या व शैक्षणिक दृष्ट्या सबल होणे त्यांना गरजेचे वाटले. अस्पृश्यता आणि जातीयता नष्ट करण्यासाठी त्यांनी अस्पृश्यांच्या शैक्षणिक विकासाला जास्त महत्त्व दिलेले आढळते. या लोकांची स्थिती सुधारण्यासाठी शिक्षणाशिवाय दुसरा प्रभावी मार्ग नाही हे त्यांनी ओळखले होते. म्हणून त्यांनी त्यांच्या शिक्षणाकडे अधिक लक्ष दिले 1901 मध्ये कोल्हापूर संस्थानात अस्पृश्यांच्या फक्त सहा शाळा होत्या त्यातील विद्यार्थी संख्या 196 होती पुढे शाहूंच्या प्रयत्नामुळे 1910 मध्ये शाळांची संख्या 27 एवढी झाली तर विद्यार्थ्यांची संख्या 732 एवढी झाली होती. त्यांनी खासगी खर्चातून सोनतळी स्टेशन बंगला आणि रुकडी येथे अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृहे चालवली होती. एवढेच नाही तर स्वतःच्या वाड्यात 50 अस्पृश्य विद्यार्थ्यांचे फुकट वस्तीग्रह आणि भोजनालय काढले होते कधी कधी ते या विद्यार्थ्यांना स्वतः अध्यापनाचे काम करीत असत. याबाबत विठ्ठल महर्षी शिंदे यांची साक्ष आहे. 1906 चा त्यांचा एक आदेश असे सांगतो की कोल्हापुरात चांभार, महार वगैरे अस्पृश्य लोकांसाठी एक रात्रीची शाळा होती. चार ऑक्टोबर 1907 च्या एका आदेशानुसार कोल्हापुरातील चांभार व ढोर अस्पृश्य समाजातील मुलींच्या शाळेसाठी मंजुरी देण्यात आली होती. त्यांचे हे कार्य संस्थानातील अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठीच नव्हते तर संस्थानाच्या बाहेर देखील अस्पृश्यांसाठी मोठे कार्य केलेले आढळते. पंढरपूर येथे 1920 मध्ये अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृह काढले. नाशिक, नागपूर येथील अस्पृश्यांच्या वसतिगृहांना पाच हजार रुपयांची देणगी देऊन व्यवस्था अधिक कार्यक्षम केली. 24 नोव्हेंबर 1911 च्या आदेशानुसार संस्थानातील सर्व अस्पृश्य वर्गास सर्व प्रकारचे शिक्षण मोफत करण्यात आले होते.सात एप्रिल 1919 रोजी अस्पृश्य विद्यार्थ्यांना दारिद्र्यामुळे वह्या, पुस्तके, पाट्या विकत घेता येत नव्हत्या म्हणून शैक्षणिक साहित्य मोफत देण्यासाठी 25 हजार रुपये मंजूर केले होते. अस्पृश्यता निवारणासाठी त्यांनी सर्वात महत्त्वाचे आणि क्रांतीकारक पाऊल जर कोणते उचलले असेल तर ते म्हणजे 28 सप्टेंबर 1911 मध्ये सवर्ण आणि अस्पृश्यांच्या शाळा वेगवेगळया भरवण्यावर घातलेली बंदी होय. हुशार विद्यार्थ्यांना दरबारातून शिष्यवृत्ती देण्यात येऊ लागली. 1920 मध्ये अस्पृश्यांच्या शिक्षणाला उत्तेजन देण्यासाठी दहा हजार रुपयांच्या प्रॉमिसरी नोट तयार करून ठेवल्या व त्याच्या व्याजातून दरमहा पाच रुपयाप्रमाणे आठ शिष्यवृत्त्या सुरू केल्या यापैकी तीन मुलींसाठी होत्या. कोल्हापूर संस्थानात 97 टक्के लोक ब्राह्मणेतर तर तीन टक्के उच्चवर्णीय होते. यातील 97 टक्के लोकांसाठी 50 टक्के आरक्षण ठेवले तर उरलेल्या 50 टक्के जागा तीन टक्के उच्चवर्णीयांना दिल्या होत्या. यात खरा अन्याय ब्राह्मणेतर जातीच्या लोकांवर होत असताना देखील शाहू महाराजांवर टीका करण्यात येत होती. सांगलीचे प्रसिद्ध वकील गणपतराव अभ्यंकर यांनी महाराजांची भेट घेऊन हे जातीचे आरक्षण कसे चूक आहे हे सांगताना ते म्हणतात की, "महाराज, तुम्ही जात पाहून स्कॉलरशिप देता, हे काही बरे नव्हे! लायकी पाहून स्कॉलरशिप किंवा नोकऱ्या दिल्या पाहिजेत" हे महाराजांनी ऐकून घेतले परंतु आपण जातवार दिलेले आरक्षण कसे बरोबर आहे हे त्यांनी एका प्रात्यक्षिकाद्वारे सिद्ध करून दाखवले. अस्पृश्यांना उच्चवर्णीयांच्या बरोबरीने आणून ठेवण्यासाठी अस्पृश्य मानलेल्या मुलास योग्य तऱ्हेचे धार्मिक शिक्षण देण्याची योजना महाराजांनी विचारपूर्वक सुरू केली. या कामी त्यांनी आर्य समाज स्वामींचा उपयोग करून घेतला. त्यांनी आपल्या पद्धतीप्रमाणे त्यांना आर्य करून घेऊन उपनयन केले व प्रथमताच त्यांना वेदांची संथा दिली. महाराजांच्या अस्पृश्यता निवारण चळवळीतील एक महत्त्वाचा भाग म्हणजे 'सत्यशोधक समाज आणि आर्य समाज'. या चळवळीच्या माध्यमातून त्यांनी अस्पृश्यता निवारणाची चळवळ जोमाने सुरू केली होती. हिंदू धर्मातील शूद्रातिशुद्रांची धार्मिक व सामाजिक पिळवणूक संपुष्टात आणण्यासाठी महात्मा फुले यांनी 24 सप्टेंबर 1873 मध्ये पुण्यात सत्यशोधक समाजाची स्थापना केली होती. या सत्यशोधक समाजाने हिंदू धर्म आणि त्या कालबाह्य धर्माच्या आधारे पोसली जाणारी विषमता नष्ट करण्याचे आणि समाजातील दुर्बल घटकांच्या आर्थिक सामाजिक आणि धार्मिक विकासाचे कार्य मोठ्या जोमाने चालवले होते. अशा सत्यशोधक समाजाची स्थापना कोल्हापुरात 11 जानेवारी 1911 मध्ये करून घेतली होती. आयुष्याच्या अखेरपर्यंत सत्यशोधक चळवळीचा विस्तार आणि विकास यासाठी सतत वरदहस्त ठेवला



Scanned with OKEN Scanner

Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth, Dist. Parbhani

.1914 मध्ये डांबर प्रकरणात महाराजांना खूप मनस्ताप सहन करावा लागला, त्यात सत्यशोधक कार्यकर्त्यांचा हात असावा असा ब्रिटिशांचा संशय होता तसेच सत्यशोधक जलशांमुळे ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर यांच्यातील संघर्ष तीव्र बनला होता. त्यांच्यात अनेक दंगली झाल्या होत्या, या दंगलींना महाराजांची फूस असल्याचा कांगावा करण्यात आला होता. त्यामुळे महाराजांनी कर्नल वुडहाऊस आणि खासेराव जाधव यांना पत्र लिहून मी, सत्यशोधक समाजाचा सभासद नाही, माझा त्या समाजाशी कसलाही संबंध नाही हे त्यांनी ठामपणे सांगितले. खरे तर ती त्यांची राजकीय खेळी होती. कारण त्यांनी आपल्या मृत्यूपर्यंत 'सत्यशोधक चळवळीची बांधिलकी तोडली नाही आणि अखेरपर्यंत सत्यशोधक समाजाचे सभासदत्व स्वीकारले नाही'. काही काळ मृत पावलेली सत्यशोधक समाजाची चळवळ शाहूंच्या कणखर नेतृत्वामुळेच महाराष्ट्रात वेगाने पसरली होती.

सन 1918 पासून महाराजांनी आर्य समाजाकडे आपले लक्ष वळवले होते खरे तर ब्राह्मणी धर्माच्या गुलामगिरीतून मुक्तता करणाऱ्या प्रत्येक चळवळीला आणि समाजाला त्यांनी जवळ केल्याचे आढळून येते. तसेच त्यांना वेळोवेळी मदतही केली. 1892 मध्ये ते उत्तर भारताची सहल करीत असताना त्यांचा मथुरेतील आर्य समाजाने मानपत्र देऊन यथोचित सत्कार केला होता. त्यांनी आर्य समाजाचे सभासदत्व स्वीकारले होते याची माहिती ते कर्नल वुडहाऊसला पाठवलेल्या पत्रात देतात. आर्य समाजाचे सभासदत्व स्वीकारण्याचे ते कारण सांगताना म्हणतात की, आर्य समाजाला अस्पृश्यता मान्य नव्हती आणि हिंदूंचे वेद हे सर्वात पवित्र ग्रंथ सर्व जातींना वाचण्याचा अधिकार आर्य समाजाला मान्य होता. तसेच महाराष्ट्रातील ब्राह्मण ब्राह्मणेतर संघर्षात सत्यशोधक समाजाला ब्राह्मणी वृत्तपत्रांनी जाणीवपूर्वक बदनाम करून ब्रिटिश सरकारचे मत सत्यशोधक चळवळी प्रती आणि महाराजांप्रती कुलुशीत करून टाकले होते. त्यामुळे ब्राह्मणी वर्चस्वाला हादरा देण्यासाठी महाराष्ट्रा बाहेरील एखादी शक्तिशाली संस्था हवी होती म्हणून त्यांनी सभासदत्व स्वीकारले होते. ही सुद्धा त्यांची एक राजकीय खेळी होती.

मॉन्टेग्यू चेम्सफोर्ड अहवालानुसार राजकीय सत्तेत ब्राह्मणेतरांना योग्य वाटा मेळावा अशी त्यांची भूमिका होती. याला मात्र टिळकांचा विरोध होता. त्यामुळे कायदेमंडळात जातवार प्रतिनिधीत्व मिळालेच पाहिजे अशी आपली आक्रमक भूमिका त्यांनी अनेक सभा, परिषदांमधून बोलावून दाखवली होती. याचा परिणाम असा झाला की टिळकांचा तोल जाऊन अथणी येथील 11 नोव्हेंबर 1917 च्या सभेत टिळक म्हणतात, शेतकऱ्यांनी विधिमंडळात जाऊन काय नांगर धरावयाचा आहे? शिंप्यांनी तेथे जाऊन काही शिलाई मशीन चालवायची आहे? वाणी तेथे जाऊन काय तराजू धरणार? यावरून टिळकांची मानसिकता समजून येते तर शाहूंची दूरदृष्टी किती उदात्त होती हे लक्षात येते. जाती व्यवस्था नष्ट करण्यासाठी आंतरजातीय विवाह हा उपाय चांगला वाटत होता. म्हणून त्यांनी 23 फेब्रुवारी 1918 मध्ये आपल्या राज्यात आंतरजातीय विवाहस मान्यता देणारा कायदा पास केला. या कायद्याचे समर्थन सरदार वल्लभाई पटेल यांच्या थोरल्या बंधूंनी केंद्रीय कायदेमंडळात आंतरजातीय विवाह कायदा पास करताना केले. मात्र टिळकांनी आपल्या केसरी वृत्तपत्रातून या कायद्याविरोधात गरळ ओकण्याचे काम केलेले आढळते. महाराज केवळ कायदे करत नव्हते तर त्याची अंमलबजावणी आपल्या घरापासूनच करत असत म्हणूनच त्यांनी आपल्या चुलत बहिणीचा 'चंद्रप्रभा' हिचा विवाह इंदूरचे युवराज यशवंतराव होळकर यांच्याशी घडवून आणला. मराठा धनगर असा आंतरजातीय विवाह आपल्याच घरात घडून आणला पण या विवाहाला महाराज हजर नव्हते. मराठा व धनगरांचे शंभर विवाह घडवण्याचे त्यांचे नियोजन होते, पण त्यांच्या हयातीत पंचवीसच विवाह पार पडले. त्यांनी 7 फेब्रुवारी 1919 मध्ये हिंदू जैन यांच्यातील विवाहाला कायदेशीर मान्यता देऊन आंतरजातीय विवाह बरोबरच अंतरधर्मीय विवाहाला प्रोत्साहन दिलेले आढळते. न्यायव्यवस्था आणि अस्पृश्य यांचा तसा दूर दूर चा संबंध नव्हता. त्यांना न्यायव्यवस्थेत दर्जा प्राप्त व्हावा म्हणून काही अल्पशिक्षित व्यक्तींना 1908 पासून वकिलीच्या सनदा देण्यास सुरुवात केली, हे वरिष्ठ वर्गाला आवडले नाही परंतु शाहूंनी त्याचे जोरदार समर्थन करताना 1920 च्या बहिष्कृत समाज परिषदेच्या अध्यक्षपदावरून बोलताना म्हणतात, "ज्या महार मांगास मी वकिलीच्या सनदा दिल्या त्यांच्यापेक्षा विद्येने व अकलेने फार कमी अशा, पुष्कळ वरिष्ठ जातींच्या लोकांस कित्येक देशी संस्थानातून वकिलीच्या सदा देण्यात येतात, याबद्दल मात्र समाजास काही कमीपणा वाटत नाही". यावरून त्यांनी न्यायव्यवस्थेत अस्पृश्यांना सन्मान प्राप्त करून दिलेला आढळतो त्या काळात खूप मोठ्या प्रमाणात जातीनिर्देशक आडनावे होती ती बंद करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. त्यासाठी ते कुस्त्यांच्या मैदानात महार, चांभार, भंगी पैलवानांना लढतीसाठी पुकारत असताना जाट सरदार व पंडित अशा शब्दांनी त्यांना बोलावण्याची पद्धत सुरू करून त्यांना सन्मान प्राप्त करून दिला. एवढेच नाही तर अस्पृश्यांना सूर्यवंशी



Scanned with OKEN Scanner

म्हणून संबोधण्यात यावे असा हुकुमही काढला होता. महार, मांग, रामोशी बेरड, गारुडी इ. जातींना त्याकाळी 'जन्मजात गुन्हेगारी' करणाऱ्या जाती म्हणून ठरवण्यात आले होते त्यांना रोज रात्री चावडीवर हजेरी लावण्यासाठी सक्ती करण्यात आली होती. ही क्रूर पद्धत महाराजांनी 1918 मध्ये एका हुकूमद्वारे रद्द केली तर पिढ्यानपिढ्या महार कुटुंबांना वरिष्ठ जातीच्या गुलामगिरीत गुंतवून ठेवणारी महार वतनाची पद्धत 18 सप्टेंबर 1918 रोजी कायद्याने बंद केली. त्यांच्या या निर्णयाबद्दल डॉक्टर बी आर आंबेडकर यांनी आपल्या जनता अंकातून असे म्हटले आहे की, "शाहू महाराजांसारखा सखा अस्पृश्यांना पूर्वी कधी लाभलेला नव्हता व पुढे लाभेल की नाही याबद्दल आम्हास शंका आहे". अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी ते एका बाजूने राजसत्तेचा, कायद्याचा वापर करत तर दुसऱ्या बाजूने ते आपल्या सार्वजनिक वर्तनातून जाती निर्मूलनाचे काम करत असत उदाहरणार्थ गंगाराम कांबळे या अस्पृश्य व्यक्तीला हॉटेल काढून दिले होते. ते आपल्याबरोबर उच्च कुळातील ब्राह्मण, मराठा सरदारांना जाणीवपूर्वक त्या हॉटेलमध्ये चहा पानाला घेऊन जात असत. एवढेच नाही तर आपल्या वाड्यातील भवानी मातेचे मंदिर अस्पृश्यांसाठी खुले करून टाकले होते. सर्व सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यांना मुक्त प्रवेश देऊन याचे उल्लंघन करणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांना आपल्या नोकरीचा राजीनामा द्यावा लागत असे. डॉ. बी .आर. आंबेडकर यांच्या प्रत्यक्ष भेटीनंतर त्यांच्या अस्पृश्यता निवारण कार्याला अधिकच गती प्राप्त झाली 20 मार्च 1920 च्या माणगाव परिषदेत त्यांनी अस्पृश्यतेवर हल्ला चढवून आतापर्यंत केलेल्या कार्याचा उल्लेख केला. याच भाषणात ते अस्पृश्यांनी आपला नेता म्हणून डॉ. बी. आर. आंबेडकर यांना निवडावे असे सुचित करतात. महाराजांनी आंबेडकरांच्या मूकनायक वृत्तपत्रास प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य करून अस्पृश्यांप्रती मोठी जनजागृती केली. वेदोक्त प्रकरण घडण्यापूर्वी महाराज सनातनी होते वर्णव्यवस्था मानत होते हे त्यांनीच 15 एप्रिल 19 20 च्या नाशिक मधील उदाजी मराठा विद्यार्थी वस्तीगृहाच्या पायाभरणीच्या प्रसंगातील भाषणात सांगितले होते. ते म्हणतात मी प्रथमतः अगदी कॉन्झर्व्हेटिव्ह म्हणजे जुन्या मताचा कट्टर अभिमानी होतो. जातीभेद कायम राहिला पाहिजे व पाळला पाहिजे असे माझे मत असे, अशा दुराभिमानाने इतरांची उन्नती होण्याच्या मार्गात मी अडथळा करतो याची जाणीव मला नसे. दुसऱ्या जातीच्या लोकांनी भरविलेल्या सभेत जाऊन अध्यक्षता स्वीकारणे म्हणजे आपला धर्म बुडविणे असे मला वाटे. महाराज सुरुवातीला अत्यंत परंपरावादी वाटतात. तसेच ते वंशपरंपरागत अस्पृश्य मानलेले यांची जरी शिवा शिव झाली नाही तरी ते शिवाशिव झाली असे समजून स्नान करीत होते. अस्पृश्यता निवारण कार्यात ब्राह्मणांबरोबरच स्वतःला सवर्ण समजणारे मराठा व इतर जातीचे लोक त्यांना विरोध करतच होते. हे करत असताना महाराजांना त्यांनी काही तशा पदव्याही दिल्या होत्या. 30 मे ते एक जून 1920 अशी तीन दिवसांची बहिष्कृत समाजाची परिषद नागपूरला भरली होती. या परिषदेला त्यांनी उपस्थित राहू नये यासाठी वेगवेगळे प्रयत्न सनातन्यांनी केले त्यांना काही धमक्याही मिळाल्या, परंतु त्याला भीक न घालता ते या परिषदेला उपस्थित राहिले. त्यांचे नागपुरात एका बाजूने मोठे स्वागत होत असतानाच दुसऱ्या बाजूने नागपूर शहरात ' धेडोका राजा ' ही पदवी देऊन त्यांचा निषेध करणारी पत्रके शहराच्या प्रमुख जागेत लावली होती. तर नागपूरचे राजे रघुजीराव भोसले शाहू महाराज आपल्याबरोबर अस्पृश्य लोकांना घेऊन येतील त्यामुळे वाडा बाटून जाईल म्हणून ते शिकारीच्या निमित्ताने नागपूर शहर सोडून बाहेर गावी गेले होते. महाराजांनी केवळ अस्पृश्य जातींसाठीच कार्य केले असे नाही तर भटक्या, विमुक्त जातीच्या लोकांसाठी सुद्धा मोठे कार्य केले आहे. सोनतळी 900 ते 1000 पारध्यांना रोजगार उपलब्ध करून त्यांच्यातील गुन्हेगारी प्रवृत्ती नष्ट केली. अनेक फासेपारध्यांना संस्थानात जमेल ती कामे दिली कंकणवाडी, खणदाळ, अलगवाडी या गावच्या हद्दीत 40 फासेपारधी कुटुंबप्रमुखांना 2880 एकर जमीन इनामी करून दिली. तसेच बाहेरगावी शिकारीसाठी जाताना त्यांना कोणी विरोध करू नये म्हणून सरकारी परवाने दिले. वेदोक्त प्रकरण सुरू असताना करवीर पिठाचे शंकराचार्य गोविंदशास्त्री भिडवलीकर हे गृहस्थआश्रम सोडून संन्यासी बनून धर्म नेतृत्व करीत होते. तरीही त्यांचा संसाराचा पाश तुटला नव्हता ते विद्याशंकर भारती उर्फ गुरुस्वामी नावाने ओळखले जात होते. अचानक त्यांची तब्येत खराब झाल्याने त्यांनी आपला वारस म्हणून काशिनाथ बुवा गोसावी ब्राह्मणाळकर यांची 23 फेब्रुवारी 1903 मध्ये निवड केली. त्यावेळी शाहू महाराजांबरोबर चर्चा करणे आवश्यक होते पण तसे केले नाही. त्यांच्या बेबंध वर्तनास पायबंद घालण्याची आवश्यकता महाराजांना वाटत होती. जुन्या धर्म पिठाचे पुनरुज्जीवन करावे की बहुजनांचे नवीन धर्मपीठ उभारावे या द्विदा मनस्थितीत असतानाच त्यांना महाभागवत डॉक्टर कुर्तकोटी यांच्याबाबत सविस्तर माहिती मिळाली होती त्यामुळे त्यांची या पदावर नेमणूक करण्यात आली ते अनेक सभा संमेलनातून वर्ण, जाती आणि अस्पृश्यता यावर कडाडून



Scanned with OKEN Scanner

टीका करीत. ते एवढे पुरोगामी होते की, पहिल्या महायुद्धात अडकून पडलेल्या मराठा सैन्याला छत्रपती शाहूंनी जगण्यासाठी घोड्यांचे माऊस खाणे हे वर्तन धर्मबाह्य नाही हे निक्षुण सांगणारे जे सविस्तर पत्र पाठवले होते त्या पत्राला धर्मशास्त्राचा आधार डॉक्टर कुर्तकोटी आणि भास्करराव जाधव यांनीच काढून दिला होता. यावरून डॉक्टर कुर्तकोटी पुरोगामी असल्याची खात्री पटली होती. परंतु 1917 मध्ये करवीर मठात मिस क्लर्क वस्तीगृहातील काही अस्पृश्य विद्यार्थी डॉक्टर कुर्तकोटी शंकराचार्यांचे वेदांता वरील प्रवचन ऐकण्यासाठी गेले परंतु त्यांना मठाच्या पटांगणातही उभे राहून प्रवचन ऐकण्यास विरोध केला. त्यावेळी त्यांचा पुरोगामीत्वाचा बुरखा फाटला 'भिक्षुकशाहीचे बंड' मोडून काढण्यासाठी नूतन शंकराचार्य आपल्या खांद्याला खांदा लावून काम करील ही महाराजांची अपेक्षा फोल ठरली. त्यामुळे पाच फेब्रुवारी 1919 रोजी एका खास ठरावाद्वारे त्यांनी डॉक्टर कुर्तकोटी कोटी यांची करवीर पिठाच्या शंकराचार्य पदावरून हकालपट्टी केली. यानंतर 11 नोव्हेंबर 1920 मध्ये तत्त्वज्ञान विषयाचा पदवीधर असणारा आणि सत्यशोधक विचाराच्या सदाशिव लक्ष्मण पाटील या तरुणाला क्षात्रजगतगुरु म्हणून वैदिक मंत्रघोषात पट्टाभिषक करण्यात आला. ही लढाई महाराजांनी यशस्वीरित्या जिंकली होती त्यांच्या या अस्पृश्यता निवारणाच्या कार्याचे केवळ देशातूनच नव्हे तर परदेशातूनही दखल घेतल्याचे आढळून येते. महाराजांचे गुरुवर्य फ्रेझर त्यांच्या पत्रात ते म्हणतात तुम्ही मागासलेल्या लोकांच्यासाठी खूप चांगले काम करीत आहात त्याचा अर्थ ब्राह्मणांना त्रास देणे असा कोणी करीत असतील तर खुशाल करोत". कॅलिफोर्निया वरून मॅरी मार्शल 20 जून 1920 ला महाराजांना खास पत्र पाठवून त्यांच्या जातीसंस्था नष्ट करण्याच्या कार्याचा धडा इतर संस्थानिकांनी घ्यावा असा गौरव करतात. श्रीपतराव शिंदे 'विजय मराठा', भगवानराव पाळेकरांचे 'जागृती' वालचंद कोठारी यांचे'जागरूक यासारखी ब्राह्मणेतर पत्रके त्यांच्या अस्पृश्य उद्धाराच्या कार्याचे वृत्तांत छापून त्यांचा गौरव करीत असत. महाराजांनी त्यांच्या कार्याला विरोध करणाऱ्या लोकांचा कधीही व्यक्तिशः द्वेष केला नाही. विरोध त्यांच्या विचाराला आणि प्रवृत्तीला केला. याचे उत्तम उदा: म्हणजे लोकमान्य टिळकांच्या मृत्यूची बातमी समजताच त्यांनी आपल्या समोरील जेवणाचे ताट बाजूला सारून संस्थानातील सर्व कचेऱ्या बंद करण्याचा आदेश दिवाणांना दिला होता.

अशा मानवतावादी आणि सामाजिक न्यायाचा आधारस्तंभ असणाऱ्या महाराजांचा मृत्यू 6 मे 1922 मध्ये पन्हाळा लॉजवर झाला. त्यांच्या मृत्यूनंतर अनेक वृत्तपत्रातून साप्ताहिकातून सविस्तर बातम्या प्रसिद्ध झाल्या. त्यावेळी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या मूकनायक ने"महाराजांच्या या अकस्मित मृत्यूमुळे आज सहा सात कोटी बहिष्कृत समाजाच्या उन्नती रुपी स्वर्गीय सुखाचा सर्व आधार तुटून तो समाज पोरका झाला आहे. असे म्हणण्यात कोणताच प्रत्यवाय नाही. " तर प्रबोधनकार ठाकरे आपल्या प्रबोधन मध्ये लिहितात"शाहू महाराजांच्या मृत्युने एक पट्टीचा राजकारणी,मुत्सद्दी,खंबीर समाज सुधारक, धैर्यवान धर्मक्रांतीकारक, सक्रिय अस्पृश्योद्धारक, जगप्रसिद्ध पैलवान, निधड्या छातीचा शिकारी, राष्ट्रीय पक्षाच्या कारस्थानी मर्मातला काटा आणि दीन दुबळयांच्या भवितव्यावर प्रकाश पाडणारा सर्च लाईट नाहीसा झाला असेच म्हटले पाहिजे. असा मजकूर छापून श्रद्धांजली वाहिली होती.

संदर्भ

1) जयसिंगराव पवार , राजर्षी शाहू महाराज, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी कोल्हापूर.
2) फडके य.दी., शाहू छत्रपती आणि लोकमान्य, विद्या प्रकाशन पुणे.
3) बागल माधवराव, श्री शाहू महाराज यांच्या आठवणी., प्रकाशक माधवराव बागल कोल्हापूर.
4) धनंजय कीर , राजर्षी शाहू छत्रपती एक समाज क्रांतिकारक राजा, पॉप्युलर प्रकाशन मुंबई.
5) जाधव रमेश, शाहू छत्रपती आणि लोकमान्य टिळक: एक शोध, पद्मगंधा प्रकाशन पुणे.
6) ठाकरे प्रबोधनकार, माझी जीवनगाथा, सोमैय्या प्रकाशन.
7) माने लक्ष्मण, उपरा, ग्रंथाली मुंबई
8)लठ्ठे, आ.बा., छत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र, कोल्हापूर स्टेट, कोल्हापूर
9)सूर्यवंशी कृ. गो., राजर्षी शाहू : राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन पुणे.

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani



Scanned with OKEN Scanner